म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५५०२
१९३४

काव्य १००५
१०/१०/४०

REFBK-0005143
REFBK-0005143

'कला-मण्डळ', पुणें.

१८३४

दा. क्र.
५१४३

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. क्रमांक १०८४
ता. १५/५/७०
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५०३८
ठाणे.

# स्नेह-प्रभा

[ कला-मण्डळांतील कवि-सदस्यांच्या निवडक कवितांचा संग्रह ]

REFBK-0005143
REFBK-0005143

'कलामण्डळ', पुणें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५१५४३

१९३४

किम्मत ६ आणे

## 'कला-मण्डळा'चे सदस्य

१ वि. प. कुलकर्णी ( चिटणी
२ रा. मा. कुलकर्णी
३ अ. ह. जोशी
४ प्र. ल. करम्बेळकर ( कवि पुष्कर )
५ पु. वि. करन्दीकर
६ पं. गं. सप्रे
७ द. वा. पारसनीस ( कवि दत्तात्रय )
८ नी. वि. सोवनी
९ पु. द. पटवर्धन

---

प्रकाशक : पु. द. पटवर्धन, सदस्य, 'कला-मण्डळ'
विष्णुपुरा, खोली नं. २५, पुणें २.

मुद्रक : ल. ना. चापेकर, 'आर्यसंस्कृति मुद्रणालय',
१९८ (१७) सदाशिव पेठ, टिळकरस्ता, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.

आमचे प्रिय आणि परमपूज्य प्रिन्सिपल्—

**डॉ. गणेश सखाराम महाजनी,**

एम्. ए., पीएच्. डी. (केंब्रिज),
थ्री स्टार रँग्लर, स्मिथ्स् प्राईझमन्, इत्यादि,

यांचे सेवेसी—

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ४१८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# निवेदन

आमच्या 'कला-मण्डळा'ची स्थापना होऊन जरी बराच कालावधी लोटला असला, तरी आज प्रकाशित होणाऱ्या **'स्नेहप्रभे'**मुळेंच तिचें अस्तित्व दृग्गोचर होत आहे हें खरें. अर्थात् मण्डळाला एक प्रकारचें चिरस्थायित्व यावें या सदिच्छेमुळेंच आम्ही आज साहित्य-प्रांतांत प्रथम पाऊल टाकण्याचें विनम्र साहस करीत आहोंत.

काव्यसंग्रह प्रसिद्ध होण्यास कांहीं तरी वैशिष्ट्य अगर मनाची हौस कारणीभूत होते. यांपैकीं **स्नेहप्रभा** पहिल्या कारणास्तव प्रसिद्ध होत आहे किंवा कसें हें रसिकांचें पाहणें आहे. आणि तशी चर्चा प्रो. दे. द. वाडेकर यांनीं प्रस्तावनेंत करून आम्हांला कायमचेंच ऋणी करून ठेवलें आहे. दुसऱ्या कारणाचा संबंध आम्हांकडे येतो. आणि याही बाबतींत आम्हांस असेंच म्हणावयाचें आहे कीं, प्रो. रा. ग. हर्षे यांनीं आमच्या कवितांची कसोशीनें निवड केली नसती तर आमच्या हौसेचा बराच विरस झाला असता. ह्या आपुलकीबद्दल प्रो. हर्षे यांचे आम्ही आभारी आहोंत. तसेंच काव्यासंबंधीं होणाऱ्या वादविवादांत श्री. वा. भा. पाठक, एम्. ए., यांनीं स्नेहपूर्वक भाग घेतला याबद्दल त्यांचे आम्ही आभार मानतों.

ज्या एका गोष्टीचा उल्लेख करण्यांत आम्हांस अत्युत्कट आनंद ( व अभिमान ) वाटत आहे ती गोष्ट म्हणजे आमच्या कॉलेजचे

सर्वांस प्रिय असलेले प्रि.डॉ. ग. स. महाजनी यांनीं आमच्या आग्रहपूर्वक विनंतीवरून हा काव्यसंग्रह आपणां स्वतःस अर्पण करण्याला परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानितों.

आमच्यासारख्या अननुभविकांस आमच्या कॉलेजांतील प्रो. डॉ. वा. गो. परांजपे व प्रो. श्री. नी. चापेकर हे नुसतेच मार्गदर्शक झाले नाहींत तर त्यांनीं आम्हांस अनेक रीतीनें साहाय्य केलें याबद्दल आम्ही त्यांचे अतिशय ऋणी आहोंत. तसेंच 'स्नेहप्रभे'चें प्रकाशन हें जणूं काय आपलेंच आवश्यक कर्तव्य आहे असें समजून आमच्या 'महाराष्ट्र-वाङ्मय-मंडळां'तील मित्रमंडळींनीं जो आपलेपणा दाखविला त्या बाबतींतील गोड रहस्य मुग्धच ठेविलेलें बरें !--

शेवटीं, 'आर्यसंस्कृति' मुद्रणालयाचे मालक श्री. ल. ना. चापेकर यांनीं हें पुस्तक थोड्या अवधींत चांगल्या रीतीनें छापून दिल्याबद्दल त्यांचेही आम्ही कृतज्ञपणें आभार मानतों.

—सदस्य, कला-मण्डळ.

# कौतुकाचे चार शब्द

आमच्या कॉलेजांतील साहित्यप्रेमी **'कलामंडळा'** च्या **'स्नेह-प्रभा'** या काव्यसंग्रहास ही प्रस्तावना लिहितांना मला थोडा संकोच वाटत आहे. मीं स्वतः वाङ्मयाचा–विशेषतः काव्याचा चांगलासा व्यासंग केलेला नाहीं, मी कवि नाहीं, किंवा माझ्या सर्वसामान्य रसिकतेबद्दलही माझें स्वतःचें किंवा माझ्या परिचितांचें फारसें चांगलें मत नाहीं. बरें एखाद्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून त्याची साहित्यभक्तांस ओळख करून देणारा मनुष्य निदान स्वतः आधींच साहित्यभक्तांच्या विशेष माहितीचा तरी असावा;—तर तसेंही माझें नाहीं. अशा परिस्थितींत **'कलामंडळा'** च्या सदस्यांनीं आपल्या या छोट्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याची जेव्हां मला विनंति केली तेव्हां मी जरा पेंचांतच पडल्यासारखा झालों. साहित्यक्षेत्रांत या काव्यसंग्रहाच्या रूपानें प्रथमच जाहीर प्रवेश करतांना या मंडळींच्या मनांत थोडीफार कातरभावना उत्पन्न होऊन या पहिल्या प्रवेशाच्या वेळीं तरी आपणांस कौतुकबुद्धीनें उत्तेजन व धीर देणारा कोणी तरी सन्मित्र हवा असें त्यांस वाटणें साहजिक आहे. परंतु असा सन्मित्र म्हणून मला उभा करण्यांत त्यांजकडून औचित्य फारसें साधलें जात नाहीं असें मला वाटलें. तरी पण या विद्यार्थिमित्रांच्या जिव्हाळ्याच्या आणि आग्रहाच्या विनंतीस, थोडें अनौचित्य पत्करूनही, मान दिल्यावांचून मला राहवलें नाहीं. कारण

तिचा अव्हेर करणें म्हणजे या जिव्हाळ्याचाच अवमान करणें झालें असतें. आणि असा विद्यार्थ्यांचा जिव्हाळ्याचा अवमान कोणाही शिक्षकाच्यानें व्हावयाचा नाहीं.

परंतु कोणत्याही पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याचें कबूल करणें म्हणजे सामान्यतः त्याची स्तुतीच करण्याचें कबूल करणें होय असा सर्वसामान्य नियम समजण्यास हरकत नाहीं. आणि या दृष्टीनें पाहतां या काव्यग्रंथास मूळ संपूर्ण कवितासंग्रह वाचण्यापूर्वींच प्रस्तावना लिहिण्याचें कबूल करण्यांत, त्या प्रस्तावनेंत या न वाचलेल्या कवितांचें स्तुतिपर कौतुक करण्याचेंही आगाऊ कबूल केल्यानें, बौद्धिक अप्रामाणिकपणाचें पाप माझ्या पदरीं येतें कीं काय असेंही मला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. तथापि, एक तर या '**कलामंडळा**'तील मंडळींच्या कांहीं कविता मीं पूर्वी मधून मधून बघितल्या होत्याच. परंतु याहीपेक्षां सुदैवाची गोष्ट अशी कीं, या काव्यसंग्रहासाठीं ही मंडळी तयारी करीत असतांना त्यांनीं आपल्या कवितांच्या मूळ संपूर्ण वह्या ज्या मला दाखविल्या त्यांवरून माझी अशी खात्री झाली कीं, मंडळाच्या सदस्यांच्या लिखाणांत अभिजात काव्यगुण असणाऱ्या कविता पुष्कळ असून त्यांतील निवडक कवितांचा त्यांनीं योजल्याप्रमाणें संग्रह केल्यास, व त्यांबद्दल प्रस्तावनेंत स्तुतीचे कांहीं शब्द लिहिल्यास ते बौद्धिक अप्रामाणिकपणा दर्शविणारें केवळ पोकळ कौतुक म्हणून ठरण्याचा बिलकूल संभव नाहीं. इतकी खात्री करून घेतल्यानंतर मात्र मीं या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचा बेत मुक्रर केला. ही झाली माझ्या प्रस्तावनेची प्रस्तावना ! असो.

स्थळ प्रत

या संग्रहांत ‘ **कलामंडळां** ’ तील सात कवींच्या चौतीस निवडक स्फुट कविता आहेत. पैकीं पांच कवींच्या म्हणजे रा. **करंदीकर**, रा. **दत्तात्रय**, रा. **जोशी**, रा. **कुलकर्णी** व रा. **सप्रे** यांच्या प्रत्येकीं ६।७ कविता दिल्या असून बाकीच्या दोन कवींच्या म्हणजे रा. **सोवनी** व रा. **पुष्कर** यांच्या प्रत्येकीं केवळ १।२ कविताच दिल्या आहेत. या दोन कवींच्या आणखी कांहीं कविता दिल्या असत्या तर त्यांच्या कवित्वाविषयीं अधिक निश्चित मत बनवितां आलें असतें. परंतु पहिल्या पांच कवींच्याबद्दल मात्र निश्चित असें म्हणतां येतें कीं, या संग्रहांत अंतर्भूत केलेल्या त्यांच्या कवितांपैकीं बहुतेक कविता आपल्या काव्यगुणानें रसिकांस प्रिय होतील अशाच आहेत यांत शंका नाहीं. विशेष सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, या कवींच्या कवितांत प्रत्येकाचें वेगवेगळें **व्यक्तिमत्त्व** सुचविणारें असें कांहीं वैशिष्ट्य सांपडतें.

रा. **करंदीकर** यांची कविता घेतली तर तींत एक प्रकारची सोज्वळ व निर्मळ भावना अनुस्यूत झालेली आढळते. त्यांची ईश्वरावरील एकनिष्ठ भक्ति व त्याचें विस्मरण न व्हावें याबद्दलची त्यांची आकुलता ( ‘ **मानसपूजा** ’, ‘ **मनीषा** ’, ‘ **हुरहूर** ’ ), सृष्टीबद्दलची सानंद कुतूहलबुद्धि ( ‘ **उषेचा विवाह** ’ ), तत्त्वप्रवणता ( ‘**निसर्ग आणि मानव** ’ ), देशाच्या पारतंत्र्याबद्दल वाटणारी खिन्नता ( ‘ **भारतमातेस** ’ ),—इत्यादि विशेष व भावनातरंग त्यांच्या कवितेंत दिसून येतात. त्यांची शब्दरचनाही रसानुकूल अशीच साधली आहे. विशेषतः ‘ **उषेचा विवाह** ’ ही कविता त्यांतील एका मनो-

रम सृष्टिघटनेचें शब्दचित्र चांगलें साधल्यानें चांगल्या कवींच्या कवितांत मोडण्यासारखी आहे. मला तरी ती वाचतांना कै० बालकवींची आठवण झाली. रा. **दत्तात्रय** यांच्या कवितांतही सृष्टीबद्दलचें कुतूहल (‘**अपूर्ण ग्रंथ**’), विचारप्रवणता, निरागस बाल्याचें कौतुक (‘**निद्रिस्त बालकास**’), आकुल स्त्रीप्रेम (‘**मनधरणी**’), देशहिताबद्दल तळमळ (‘**जिंकूं यशःश्री पुन्हां**’), थोरांबद्दलची सादर कृतज्ञताबुद्धि (‘**स्मृतिसमाधीवर**’), इत्यादि भावनाविशेष व्यक्त झाले आहेत. अनुकूल शब्दरचनेच्या दृष्टीनें त्यांच्या ‘**मनधरणी**’ व ‘**स्मृतिसमाधीवर**’ या कविता विशेष चांगल्या साधल्या आहेत. त्यांतही ‘**स्मृतिसमाधीवर**’ ही कविता अलीकडील चांगल्या कवितांत स्थान मिळवील अशी आहे. एकंदरीनें पाहतां रा. करंदीकर व रा. दत्तात्रय यांच्या कवितांत साधर्म्य बरेंच दिसतें. दोघांच्याही कवितेबद्दल रसिकांचें मत चांगलेंच होईल असा मला विश्वास वाटतो.

रा. **जोशी** यांच्या कवितेंतील वातावरणांत स्त्रीप्रेमाला महत्त्वाचें स्थान दिलेलें दिसतें. पण त्यांनीं या प्रेमाचे वेगवेगळ्या भूमिका कल्पून जे पैलू पाडले आहेत ते मोठे मनोरम आहेत. त्यांपैकीं एक दोन कवितांत जानपद कल्पना व शब्दरचना यांचा बहुशः यशस्वी अवलंब केला आहे. त्यांची ‘**वाघ्या**’ ही कविता गुणगुणतांना माझ्या मानसिक कर्णेंद्रियांत खरोखरच तुणतुणें वाजूं लागलें; आणि ‘**माझी माळीण**’ ही कविता वाचतांना तर माझ्या डोळ्यांपुढें त्यांनीं वर्णिलेली किसान पुरन्ध्री स्पष्टपणें उभी राहिली. त्यांच्या

## स्मृतिसमाधीवर—                    [ जाति–मुद्रिका ]

स्मृतिमुळें ज्यांचिया जिवा फुटे पालवी
चिन्तनीं मनाला ज्यांच्या लाभे संजीवनि नवी
मानवी मूर्ति त्या जरी अस्त पावल्या
स्मृतिसमाधीवरी त्यांच्या उधळितों कळ्या कोंवळ्या

झुंजुनी संकटांसवें आयु कण्ठिलें
जग सुखी कराया ज्यांनीं आपुले देह साण्डिले
द्यावया साक्ष मागुती कृती राहिल्या
स्मृतिसमाधीवरी त्यांच्या उधळितों कळ्या कोंवळ्या

जन्मली जयांपासुनी तत्त्वमौक्तिकें
चारित्र्य मुक्यांसहि ज्यांचें करि क्षणीं अहा ! बोलकें
तारकाहि ज्यांच्या यशा बघुनि लाजल्या
स्मृतिसमाधीवरी त्यांच्या उधळितों कळ्या कोंवळ्या

जीवना बघुनि ज्यांचिया शान्ति लाभते
भरुनिया भक्तिभावानें आकण्ठ हृदय दाटतें
यद्यशोदीप्तिनें दहा दिशा तळपल्या
स्मृतिसमाधीवरी त्यांच्या उधळितों कळ्या कोंवळ्या

मांगल्य ओतूनी जयें फुलविली धरा
खोदुनी झरे स्फूर्तीचें नावीन्य आणिलें जरा
पावित्र्यलता ज्यांमुळें जगीं बहरल्या
स्मृतिसमाधीवरी त्यांच्या उधळितों कळ्या कोंवळ्या

हृदयिंचीं फुलें ना अजुनि पूर्ण उमललीं
परि फुलल्या पुष्पांची त्या माधुरी जयें लाभली
ज्यामुळें मला थोरवी, भरुनि अंजुल्या
स्मृतिसमाधीवरी त्यांच्या उधळितों कळ्या कोंवळ्या

—दत्तात्रय

**समाप्त**

‘ **अबोला** ’ व ‘ **एकाकिनी तारका** ’ या कविताही बऱ्यांपैकीं आहेत. रा. जोशी यांना शब्दरचनेची सफाई चांगली साधलेली दिसते. परंतु त्यांनीं आपल्या काव्यांत विषयवैचित्र्य आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या प्रतिभेस याहीपेक्षां अधिक अवसर मिळेल असें वाटतें.

रा. **कुलकर्णी** यांच्या प्रत्येक कवितेंत वेगवेगळी भावना चित्रित झाली असून त्या त्या दृष्टींनीं त्यांच्या सर्वच कविता वाचण्यासारख्या आहेत. विशेषतः त्यांची दलितांबद्दलची अनुकंपाबुद्धि ‘ **कळावे हे कसे त्यांना** ’ या कवितेंत व्यक्त झाली आहे; तर अलीकडील आधिभौतिक शास्त्रज्ञांचा दुर्दम्य आत्मविश्वास त्यांनीं ‘ **शास्त्रज्ञांचें गाणें** ’ या कवितेंत चांगल्या प्रकारें ग्रथित केला आहे. मातृहृदयाचा पर्युत्सुकीभाव ‘ **यायचा बाळ उद्याला घरीं** ’ यांत कुशलतेनें चित्रित केला आहे. मनोमय प्रेमाच्या ‘ खोंचा ’ व ‘ डावपेंच ’ही त्यांना समजतात ( ‘ ? ’ ); आणि ‘ तेव्हां ’ उत्साहातिरेकानें कवटाळलेलीं ध्येयें खोटीं ठरल्यानंतर ‘ आतां ’ ते शुद्धीवर येऊन ( ‘ **तेव्हां आणि आतां** ’ ) परमेश्वराचा ‘ महिमा ’ही ते गाऊं शकतात ( ‘ **तुझा महिमा** ’ ). रा. कुलकर्णी भाषेचा जर अधिक साक्षेपानें अभ्यास करतील तर त्यांची कविता याहीपेक्षां सरस उतरेल यांत शंका नाहीं.

या कविमंडळांतील रा. **पंडित सप्रे** हा कवीही कमी महत्त्वाचा नाहीं. परंतु या कवीच्या लिखाणाचें बाह्य स्वरूप अत्यंत त्रुटित आहे आणि कवितेंतील पार्श्वभूमि निराशेच्या वातावरणानें व्यापिली

आहे. मात्र असें असलें तरी त्यामुळें या कवितांच्या वाङ्मयीन गुणांत कमीपणा आलेला नाहीं. किंबहुना याच गुणांमुळें या लहान लहान कविता विचारी वाचकाच्या मनास किंचित् चाटून जाऊन त्यावर टिकाऊ संस्कार करतात. या कवीच्या मनांत स्वतःबद्दल व जगाबद्दल एक प्रकारची निराशानिर्मित तुच्छताबुद्धि किंवा उपहास-वृत्ति खोलवर रुजलेली आहे असें वाटतें. परंतु कवी आपल्या निराशेस प्रबळ अथवा दुर्दम्य भावनेचें स्वरूप धारण करूं देत नाहीं; तर तीवर शांत विचाराचीं पुटें चढवून तींतून तो बुद्धिनिष्ठ विनोद उत्पन्न करितो. जग हें एक खोटें 'माप' ('**विश्व**') किंवा तुटपुंजें 'ग्रंथालय' ('**जग**') आहे असें त्यांस वाटतें. आणि हृदय हें अविचल प्रेमाचें स्थान म्हणून तो ओळखीत नसून ती एक आल्यागेल्याची 'धर्मशाळा' ('**त्याचें हृदय**') आहे असें म्हणून मानवी चांचल्याचाही त्यानें अधिक्षेप केला आहे. स्वतःच्या प्रियेकरितांही जें काय करावयाचें तेंही तो स्वस्थ राहूनच करूं इच्छितो ('**समाधान**'). विद्यालयीन जीवनक्रमांतील '**विद्यालयाचा निरोप**' आणि '**नापास झाल्यावर**' यांसारखे एरवीं गंभीर स्वरूपाचे विषयही त्याच्या खिन्न उपहासाच्या तावडींतून सुटलेले नाहींत. सारांश काय कीं, जग हें एक 'मशीद' असून आपण सर्व तींतील 'चुकलेले फकीर' आहोंत असा त्याचा निष्कर्ष आहे ('**जग**'). आणि हे सर्व विचार या कवीनें अगदीं मोजक्या शब्दांत परंतु परिणामकारक रीतीनें व्यक्त केले आहेत. या काव्यांत वाचकांस भावनांचा उद्रेक सांपडणार नाहीं;

तरी पण त्यास बुद्धिनिष्ठ विनोदाचा लाभ मात्र हमखास होईल.

प्रस्तुतच्या काव्यसंग्रहाचें स्थूल स्वरूप अशा प्रकारचें आहे. एकंदरीनें पाहतां या संग्रहांतील कवितांचा दर्जा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सर्वथा भूषणास्पद असाच असून या कविता आतां पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहेत हें बरेंच होत आहे. अलीकडे आमच्या तरुण मंडळींत काव्यवाङ्मयाबद्दलची आस्था कशी अभिनंदनीय रीतीनें वाढीला लागली आहे, आणि सत्काव्याच्या निर्मितीला अंतरींच्या स्फूर्तीबरोबरच साहित्यशास्त्राच्या सापेक्षी अभ्यासाचीही जोड पाहिजे हें सत्यही त्यांच्या मनावर कसें अधिकाधिक बिंबत चाललें आहे हें महाराष्ट्ररसिकांस या व अशा प्रसिद्ध होणाऱ्या संग्रहांवरून कळून येईल. तसेंच महाविद्यालयीन विद्यार्थिजनांच्या कवितासंग्रहांत या प्रस्तुतच्या संग्रहास बराच वरचा दर्जा प्राप्त होण्यासारखा आहे हेंही त्यांस दिसून येईल.

प्रस्तुत काव्यसंग्रहाच्या प्रसिद्धीनें यांतील कवींसंबंधानें वाचकांच्या मनांत त्यांच्या भविष्याविषयीं उज्ज्वल आशा खचित निर्माण होतील. त्या आपल्या अधिकाधिक निर्दोष काव्यकृतींनीं ही कविमंडळी सुफलित करण्यास समर्थ होवोत एवढीच इच्छा.

एवढ्या प्रस्तावनेनंतर माझ्या विद्यार्थिमित्रांचा हा छोटासा काव्यसंग्रह मी मोठ्या आनंदानें महाराष्ट्र रसिकांच्या हवालीं करितों.

फर्ग्युसन कॉलेज,
पुणें (४).
जानेवारी २३, १९३४.

देविदास दत्तात्रेय वाडेकर

'कला - मण्डळा'चें पुढील प्रकाशन

# -: सङ्गम :-

कला-मण्डळांतील सदस्यांचा लघुकथा-सङ्ग्रह

# गुरुवर्य प्रो. श्री. नी. चापेकर यांचा आशीर्वाद

'स्नेह-प्रभा' नांवाचा कविता-संग्रह वाचला. काव्यकृतिद्वारां आपल्या स्नेहाच्या प्रभेस व्यक्त व स्थायी स्वरूप देण्याचा 'कला-मंडळा'च्या सभासदांचा हा प्रथम प्रयत्न अभिनंदनीय व उत्तेजनार्ह आहे यांत शंका नाहीं. कमीअधिक मानानें संग्रहांतील सर्व कवितांत, भावी उज्ज्वल कलाविकासाचे सूचक असे काव्यप्रतिभेचे आनंददायक अंकुर दृग्गोचर होतात. "उषेचा विवाह" ही सर्वच कविता अत्यंत रम्य व उज्ज्वलकल्पनापूर्ण असून, 'मानसपूजा', 'मनीषा', 'हुरहूर', 'भारतमातेस', 'कळावे हे कसे त्यांना', 'तुझा महिमा', 'हा चोर कोण?', 'माळीण', 'वाऱ्याचें गाणें', 'एकाकिनी तारका', इत्यादि कविताही आपापल्यापरी सुंदर आहेत. 'कला–मंडळा' चा उत्कर्ष होवो आणि उत्तरोत्तर त्याच्या वाढत्या विकासयुक्त अनेक कलाकृतींनीं रसिक वाचकवर्गाला आनंदाचा लाभ होवो असें मी इच्छितों. "कलामंडळा"नें आपला कविता–संग्रह सर्वांशींच निरतिशय व अकृत्रिम "स्नेह–प्रभा–" संपन्न अशा प्रि. डॉ. ग. स. महाजनि यांस अर्पण करण्यांत आणि डॉ. वा. गो. परांजपे आणि प्रो. दे. द. वाडेकर यांच्यासारख्या प्रेमळ व योग्य मार्गदर्शक गुरुजनांच्या आशीर्वादांसह आपल्या वाङ्मयात्मक कार्याचा शुभारंभ करण्यांत जें औचित्य दर्शविलें त्याबद्दल मी त्याचें विशेष अभिनंदन करितों.

फर्ग्युसन कॉलेज, पुणें.<br>ता २२–१–३४

श्री. नी. चापेकर

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पान |
|---|---|
| मानसपूजा | १ |
| निद्रिस्त बालकास | २ |
| कळावे हे कसे त्यांना | ३ |
| अबोला | ४ |
| समाधान | ५ |
| त्याचें हृदय | ५ |
| अपूर्ण ग्रन्थ | ६ |
| भारतमातेस | ७ |
| माझी माळीण | ८ |
| यायचा बाळ उद्याला घरीं | ९ |
| मनीषा | ११ |
| साउली | १२ |
| हा चोर कोण ! | १३ |
| विद्यालयाचा निरोप घेतांना | १३ |
| ! | १४ |
| बालशाहीर | १५ |
| वाघ्याचें गाणें | १७ |

| कवितेचें नांव | पान |
|---|---|
| विश्व | १८ |
| उषेचा विवाह | १८ |
| नापास झाल्यावर | १९ |
| जिङ्कूं यशःश्री पुन्हां | २० |
| निसर्ग आणि मानव | २० |
| एकाकिनी तारका | २१ |
| तुझा महिमा | २२ |
| हुरहूर | २३ |
| जग | २३ |
| शास्त्रज्ञांचें गाणें | २४ |
| तूं | २५ |
| गूढ चित्र | २६ |
| मनधरणी | २७ |
| तेव्हां आणि आतां | २८ |
| दीपावलि | २९ |
| अवधीरणेनन्तर | ३० |
| स्मृतिसमाधीवर | ३१ |

# स्नेह-प्रभा

## मानसपूजा

[ अभङ्ग ]

भक्तीचा अखण्ड प्रवाह वाहतो
त्यानेंच घालितों स्नान देवा ! १
तुझ्याच प्रेमाचा वाहतो सुगन्ध
त्याचेंच मी गन्ध लावीं तुला २
नेत्र दोन पुष्पें अञ्जली ही कळी
तुझ्या पदतळीं अर्पितसें ३
सरळ मनाची करूनीया वात
दीप पाजळीत रात्रन्दीन ४
तुझें गोड नांव तेंच कीं मिष्टान्न
नैवेद्य करून अर्पी तुला ५
तुझेंच घेवोनी तुलाच अर्पीत
सन्तोष तूं ह्यांत मानी देवा ! ६

—पु. वि. करंदीकर

## निद्रिस्त बालकास [चाल:—तळहातीं ठेवुनीया]

हससी कां राजहंसा घन निद्रेमाजि या ?
मिटुनिया नयन आपुले
सर्व आंतलें—विश्व झांकलें
सुखविति कां येउनीया
स्मृति जन्मापूर्विंच्या ?
पसरुनी हात चिमुकले
मृदुल पोंवळें—कोंवळीं दळें
सजसी कां साठवाया
गगनींच्या चान्दण्या ?
चाळविशी बोटें किती
लुसलुशीत तीं—आणि गोरटीं
खुणविसि कां देवराया
खेळाया यावया ?
फुगविसी गाल कोंवळे
हससि मोकळें—हास्य तें खुलें
लावाया वेड साऱ्या
दिक्प्रान्ता या, गड्या !
हाससी हास्य तूं खुळें
हृदय तव खुलें—त्यामुळें कळे
भुलवाया जरि जगा या
उधळिसि हा मोतिया !

—दत्तात्रय

# कळावे हे कसे त्यांना !

[वृत्त–वसन्त]

बिछान्याखालती ज्यांनीं    कधीं ना टेकला पाय
तयांना विंचुकाट्याच्या    कळाव्या वेदना काय ?
विजेचीं विंझणें ज्यांचे    सदा थण्डावती देह
उन्हातान्हांतला त्यांना    कळावा तो कसा दाह ?
स्वतांचें वस्त्रही ल्याया    जयांना लागती दास
तयांनीं कां न कष्टांना    म्हणावें, 'मात्र आभास !'
त्रिकाळीं पञ्चपक्वान्नें    जिहीं पानावरी घ्यावीं
उपाशी या भिकाऱ्यांची    तयांना कींव कां यावी ?
स्तुतीचें स्तोत्र गाण्याला    उभे ज्यांच्यापुढें भाट
उण्या शब्दांतला त्यांना    कळावा काय फुम्पाट ?
उभारू कल्पवृक्षांचे    थवेही जो शके गेहीं
निराशावैरिणीची त्या    कळावी जाचणी कां ही ?
उभ्या स्वातन्त्र्यसिन्धूला    जयांनीं मन्थिले हातीं
तयांनीं पारतन्त्र्याला    म्हणावें कां न हाकाटी ?
जयांची लाडकी सत्ता    चढावी धुन्द ही ज्यांना
पवाडे दीनदीनांचे    कळावे हे कसे त्यांना ?

—रामचन्द्र माधव कुलकर्णी

## अबोला

[ राग—सारंग ]

किती वेळ सांगूं तुजला सोड हा अबोला !
प्रेमरंजितांच्यासाठीं कायदा कशाला ?
अपांगांस आली लाली
राग रंगलेला गालीं
परी रागवोनी होई फायदा कुणाला ?
बांकदार भुंवई नमली
आणि नासिका थरथरली
चित्र माधुरी हें देई प्रीतिजीवनाला !
मनामधें वादळ चाले
परी येथ खिळले डोळे
काव्यदेवता ही लागे भाव गावयाला !
कमलिनि या कानांवरल्या
कांहिं सांगण्यासी लवल्या
रोष हा कसासा वाटे त्यांचिया मनाला !
सर्व हें कशाच्यासाठीं
गुप्त मला कळल्या गोष्टी !—
येत कां तयाच्यासाठीं रक्तिमा कपोला ?
होय गडे ! झाला वेळ
गुन्हा मान्य लाखों वेळ
किती काळ टिकवायाचा हा असा अबोला !

—अनन्त हरि जोशी

## समाधान

[ जाति–सूर्यकांत ]

"They also serve who only stand and wait."
— *Milton.*

मनांत येई एक तरी कप द्यावा तुजसी चहा
परी चहाचें दुकान तरि तें तुझ्याच दारामधीं !
गात बसावें गीत तुझें तर तुझ्याच वाड्यामधीं
गाण्याची लयलूट सारखी गायन–क्लास करी !
वाटतसें कीं कवन रचावें तुजवर तर हे पहा
जीव टाकिती पाहुनि तुजसी कितीक रोज कवी !
—काय करूं मग–सुचे न कांहीं–वाटतसे आतां
स्वस्थ राहुनी तुजसाठीं तरि काय न ये करितां ?

—पण्डित सप्रे

## त्याचें हृदय

[ जाति–दिण्डी ]

"आणि म्हटलें, 'राहील ही सुखानें !'
परी माझें दुर्दैव ! ती न राहे !"
अशा आल्या कितिएक गोड पोरी
आणि गेल्या हृदयांतुनी निघोनी !
हृदय कसलें ?—छेः ! असे धर्मशाळा !
तिथें कायम राही न कुणी बाला !

—पण्डित सप्रे

## अपूर्ण ग्रन्थ

[ जाति–चन्द्रकान्त ]

—आणि काल हा एक मनोहर ग्रन्थ ईश्वराचा
मायेचा इतिहास त्यामधें भरलासे त्याच्या
दिवस-रात्र हीं पानें अद्भुत तमोगुणी त्याचीं
निमिषरूप त्या शब्दांनीं तीं रङ्गविलीं साचीं
सूक्ष्म भावना, नव्या कल्पना चितारिल्या यांत
पानोंपानीं त्या आढळुनी रसोत्कर्ष होत !
दिव्य शब्द ते, रम्य माण्डणी, तेजोमय वाणी
स्फूर्ति निरन्तर निथळे त्यांतुनि–अघटित प्रभुकरणी !
रसरत्नाकर– नऊ रसांचा सङ्गम हा येथें
परन्तु महती शोकरसा कीं काव्य त्यांत वसतें
गद्य न येथें पद्यहि नुसतें केवळ नच यांत
‘ ग्रन्थराज हा अपूर्व ’ ऐशी याची जगिं कीर्त !
लिहिलीं जातिल असङ्ख्य पानें अशींच यापुढतीं
अपूर्ण आहे तसा राहणें परन्तु हा...

—दत्तात्रय

## भारतमातेस–

[ चाल–महाराष्ट्र-गीत ]

माते ! तूं जाहलीस दीन कां अशी ?
विभवेच्छा भङ्गुनि कां जाय मानसीं ? ॥ ध्रु० ॥
शतवर्षें दास्याचीं जाहलीं पुरीं
होइ पाश परक्यांचा सैल ना तरी !
धडपडसी जोंवरती तन्निवारणा
अपयश येऊन मना होति यातना
तव कार्यीं जे लढले थोर नरमणी
अबल हाय ! कारागृहिं होत ते धनी
क्लेश काय पाहुनि ते तूंहि कष्टसी ? १
वीरांची जननी तूं स्फूर्ति जणुं अम्हां
बघुनी तव वदन अम्हीं वारितों श्रमा
दे आम्हां तूंच धैर्य आजला नवें
अरिपुढती चमकूं मग वीर जयरवें
कालाचें चक्र सदा हें फिरायचें
भाग्याचे त्यासवेंच दिवस यायचे
मग भीती वाटावी काय अपयशीं ? २

—पु. वि. करंदीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य
ता.

## माझी माळीण

[ जानपद गीत ]

माळिण रूपानं लइ गोड
गोड तियेची प्रीत तियेला गोड रीतिची जोड !
घरचा सरला वैरणदाणा
हळूंच मजला सांगे ' आणा ! '
कळे न मजला असा बहाणा
करितां सांगे हळूंच कानीं करुनी सारी फोड !
घरीं जरासं काम वाढलं
पाउसपाणी जरा बाधलं
पाणी बदललं त्येंहि जाचलं
म्हणुनी राणी जरा श्रमांनीं झाली माझी रोड !
कष्ट कितीही पडले मजला
घामानं जरि देह चिम्बला
माळिण माझी हंसवायाला
रक्ताचंबी पाणी करुनी पुरविन तीचं कोड !
न्याहरी शेतावरती नेते
सन्ध्याकाळीं वाट पाहते
कधीं काम शेतावर करिते
करण्याची अशि प्रीत तियेला लई दिसांची खोड !

—अनन्त हरि जोशी

## यायचा बाळ उद्याला घरीं [ चाल–केशवकरणी ]

“सुटी लागते जर शाळेला आजपासुनी तरी
यायचा ‘ बाळ ’ उद्याला घरीं !
कुठें पत्र तें बघूं ?—नको परि वाचुन दावा मला
—कळतें काय मला वेडिला ?
निघेल कां तो आज सान्जला ?—उजाडतां यायचा ?
नको तें !—उगाच जागायचा !
तो थेट पुण्याहुनि प्रवास किति जाचक
यायचा एकटा, त्यांतुनि तो बालक
लागेल झोंप तर होइल कांहीं चुक
जाइल कुठच्या कुठें—सुखाची झोंप न येई खरी
यायचा ‘ बाळ ’ उद्याला घरीं ! १
चार मास तर काल जाहले पुरे जाउनी तया
उताविळ असेल तो यावया.
ओळखील का बेबी ?—कसली लबाड !—तिज ना मुळीं
कुणाची ओळख कधिं लागली
दङ्ग तिच्या खेळांतच—तिजला ‘ भाउ ’ न ‘ ताई ’ तशी
तिची ती, अप्पलपोटी जशी !
पाहील तयाला कितीक दिवसान्तरीं
मग कशी अगोदर ओळखील ती तरी ?
विस्मृती लेंकरां प्रभुजी देई बरी !

म्हणुनी केव्हां उत्कण्ठेनें होतिं न तीं बावरीं—
यायचा 'बाळ' उद्याला घरीं २

उभे असे कां ?—कां हंसतां मज ?—हंसूं तुम्हांला सुचे
हंसूं परि ' इकडचेंच ' होतसे
उगिच चिडवितां दुसऱ्याला, जणुं स्वतांस मुळिं काळजी
लागली बाळाची ना दुजी
जा मेलं—मी बोलणार नच आतां याच्यापुढें
कशाला अन्तर हें मम कढे ?
हं कळलें आतां—आलें ध्यानीं बरें !
हा खेळ माण्डिला तुम्हींच—हो ना खरें ?
फसविलेंत मजला साङ्गुनि खोटें पुरें !
पत्र न कांहीं—उगाच केली थट्टा ध्यासावरी—
'यायचा बाळ उद्याला घरीं !' " ३

* * *

"नव्हे प्रेमले ! उगा कशाला अन्त पाहुं मी तरी
हांसवी वत्सलता तव परी !
मायापाशीं तुझ्या गुन्ततां दानव देवांपरी
होतिल सगळे हृदयान्तरीं
तव प्रीतीच्या मन्दिरांत जो टाकिल नव पाउल
प्रीतिचा पाइक तो होइल

धन्य तो ‘ बाळ ’ कीं तुजसम ही माउली !
निजभाग्यें ज्याला सुखासुखें लाभली
जी निजप्रेमाची करील नित साउली
कुठें जरासें कुणी बोलतां गाइल वेड्यापरी
‘ यायचा बाळ उद्याला घरीं ’ ”

—रामचन्द्र माधव कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं.
ता.

## मनीषा

[ अभङ्ग ]

वर्षाकालीं नदी वाहे दोन्ही थडी
ओसरून जाई कालान्तरें १
जाईजुई वेल फुलांनीं बहरे
पुष्पावीण झुरे कालान्तरें २
जलवीचिसम जीवन भङ्गूर
नाश पावणार कालान्तरें ३
आपत्कालीं देवा घेतों तुझें नाम
होई विस्मरण कालान्तरें ४
मनीं हीच आशा विसर न व्हावा
तुझीया नांवाचा कालान्तरें ५

—पु. वि. करंदीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.

## साउली

[ सुनीत ]

जन्मापासुनि या जगीं, जिवलगे, मैत्री असे आपुली
अन्योन्या विसरून दूर न कधीं गेलों कुठें आपण
काळोखीं घन मी तुला मिळवुनी माझ्या स्वरूपामधें
विश्वा दावितसे, गडे, असिसि तूं माझीच ‘ माया ’ जगीं
माझी तूंच खरोखरी सकलही या भूतळीं जिन्दगी
मृत्यूनन्तर माझिया मजसवें येशील शून्यामधें
नित्याचा सहवास दीर्घ परि हा भारूनिया मन्मन
प्रीतीचें विमल स्वरूप तुझिया झांकून टाकी मुळीं !
कीर्ती आणिक प्रीतिही मज दिसे रूपीं तुझ्या, साउली !
तेजस्वी जरि त्या जगीं तुजहुनी, त्यांठायिं तूझे गुण
दोघीही मनुजासवें तुजपरी उर्वीवरी येउनी
तच्चारित्र्य जगाप्रती कथिति त्या त्याच्याच कृत्यांतुनी !
त्याचें त्या धन दैवदत्त ( उरती त्या मात्र त्यामागुन )
नित्याचा सहवास तो परि करी दृष्टी पुरी आन्धळी !

—दत्तात्रय

## हा चोर कोण ? [ चाल–असा धरि छन्द ]

चोर हा कोण ? आपणांस ठाऊक कां न ?
बागेमध्यें जरी प्रभातीं
दंवबिन्दू हे झाडावरती
सायंकाळीं ते नच दिसती
चोरतें कोण ? आपणांस ठाऊक कां न ?
निशीथसमयीं नभीं बघावे
तारे पाहुनि विस्मित व्हावें
सुप्रभातिं परि ते न दिसावें
वञ्चितें कोण ? आपणांस ठाऊक कां न ?
वर्षाकालीं झरा वाहतो
मधुरजलानें मन तोषवितो
निदाघसमयीं कोठें जातो ?
नेइ त्या कोण ? आपणांस ठाउक कां न ?

—नी. वि. सोवनी

## विद्यालयाचा निरोप घेतांना [ जाति–भूपतिवैभव ]

येई न जगीं या घेउनिया कुणि कांहीं !
कांहीं न घेउनी जाइ कुणी परलोकीं !
तैसाच जातसे निरोप घेउनिया मी
संगें न शिदोरी परन्तु घेउनि कांहीं !

—पण्डित सप्रे

# साउली

[ सुनीत ]

जन्मापासुनि या जगीं, जिवलगे, मैत्री असे आपुली
अन्योन्या विसरून दूर न कधीं गेलों कुठें आपण
काळोखीं घन मी तुला मिळवुनी माझ्या स्वरूपामधें
विश्वा दावितसे, गडे, असिस तूं माझीच ‘ माया ’ जगीं
माझी तूंच खरोखरी सकलही या भूतळीं जिन्दगी
मृत्यूनन्तर माझिया मजसवें येशील शून्यामधें
नित्याचा सहवास दीर्घ परि हा भारूनिया मन्मन
प्रीतीचें विमल स्वरूप तुझिया झांकून टाकी मुळीं !
कीर्ती आणिक प्रीतिही मज दिसे रूपीं तुझ्या, साउली !
तेजस्वी जरि त्या जगीं तुजहुनी, त्यांठायिं तूझे गुण
दोघीही मनुजासवें तुजपरी उर्वीवरी येउनी
तच्चारित्र्य जगाप्रती कथिति त्या त्याच्याच कृत्यांतुनी !
त्याचें त्या धन दैवदत्त ( उरती त्या मात्र त्यामागुन )
नित्याचा सहवास तो परि करी दृष्टी पुरी आन्धळी !

—दत्तात्रय

## हा चोर कोण ? [ चाल–असा धरि छन्द ]

चोर हा कोण ? आपणांस ठाऊक कां न ?
बागेमध्यें जरी प्रभातीं
दंवबिन्दू हे झाडावरती
सायंकाळीं ते नच दिसती
चोरतें कोण ? आपणांस ठाऊक कां न ?
निशीथसमयीं नभीं बघावे
तारे पाहुनि विस्मित व्हावें
सुप्रभातिं परि ते न दिसावें
वञ्चितें कोण ? आपणांस ठाऊक कां न ?
वर्षाकालीं झरा वाहतो
मधुरजलानें मन तोषवितो
निदाघसमयीं कोठें जातो ?
नेइ त्या कोण ? आपणांस ठाउक कां न ?

—नी. वि. सोवनी

## विद्यालयाचा निरोप घेतांना [ जाति–भूपतिवैभव ]

येई न जगीं या घेउनिया कुणि कांहीं !
कांहीं न घेउनी जाइ कुणी परलोकीं !
तैसाच जातसे निरोप घेउनिया मी
संगें न शिदोरी परन्तु घेउनि कांहीं !

—पण्डित सप्रे

प्रश्न टाकतांना साधे किती डावपेंच ?
मला तुझ्या शब्दांतिल कां आकळे न खोंच ?
आर्त कोण झालें आधीं प्रीत पाहुनीयां ?
खिळुनि राहिले कोणाचे नेत्र मुग्ध वाया ?
प्रथम कोण लागे अपुली साङ्ग प्रीत गाया ?
उगिच परी वदसी, " तुम्हां हृदय का नसेच ? "
हंसे नाचतां तव वदनीं मनीं धीर येई
स्तब्ध राहतां तूं माझा मोद दूर जाई
खन्त वाटते नच बघुनी तुझी कारवाई
" द्वैत भाव," तरिही म्हणसी, " कसा देइ जाच ? "
सदा यावया तव सदनीं शोधितसे धागे
दिवस एक टळला नाहीं भेटल्याविना गे !
रोज परी शङ्का कसली तुझ्या मनीं वागे ?
जावयास निघतां वदसी, " उद्यां यायचेंच ! "
खुबी मला कळते सारी तुझ्या बोलण्याची ?
अजुनि तुला पटली नाहीं खूण अन्तरींची ?
म्हणुनि तऱ्हा उलटी का ही दूषवावयाची ?
दिलें प्रेम त्याची तूं का करूं नये पोंच ?

—रामचन्द्र माधव कुलकर्णी

स्थळ अंक
नं.
नं.
ता.

( १ )

जातिवंत शाहीर कुलाचा नवा बालवीर ।
सहर्ष गेला समररंगणीं बिचवा शाहीर ॥
भगवा फेटा शिरीं बांधुनी रेखुनिया भालीं ।
टिळा सोवळा मंगलतेच्या, विजयाचा वाली ॥
करीं तुणतुणें डफ घेवोनी चढवुनि रणवेश ।
कसली नागिण स्वीयकुळाची अपुल्या कमरेस ॥
पुण्य पुरातन भवानीपदीं नमवुनि निजशीर ।
सहर्ष गेला समररंगणीं बिचवा शाहीर ॥

( २ )

पोवाडा गाण्यास डफावर कडकडली थाप ।
छेडुं लागलें छान तुणतुणें तारा निज साफ ॥
धों धों धांवे निर्झर जैसा अति उल्हासानें ।
शिशिरामधला जसा वाहतो वायू वेगानें ॥
देशभक्तिनें युक्त शाहिरी वाणीचा झोत ।
नसानसांतुन उसळुं लागला समररंगणांत ॥
महाराष्ट्रपदिं मान वाहुनीं मुकल्या मर्दांची ।
गीतें गावुनि मर्दपणाचीं मर्द चालिवरचीं ॥
गानिं गुंगतां रंगुनि गेला झाला बेभान ।
रणभूमीवर चैतन्याचें उठलें थैमान ॥

शब्दाशब्दासवें शत्रुचें तुटुनि पडे शीर ।
सहर्ष गेला समररंगणीं बिचवा शाहीर ॥

( ३ )

थाप डफावरि कडकडते जों बालशाहिराची ।
पडतीं प्रेतें चमकवितीं निज बिजली शेवटची ॥
नैराश्यानें झालेलीं मग हृदयें खडकाळ ।
नव्या दमानें कां न बनावी शत्रूला काळ ॥
सह्याद्रीचे फत्तर सारे जे मेल्यावाणी ।
दावुं लागले निज अंगींचें खळाळून पाणी ॥
गभीर नादब्रह्म वहरला जसा पवाड्याचा ।
गभीरतेनें सिंधु वाहिला रिपुच्या रक्ताचा ॥
मधुमंदस्मित किरणमालिका पसरित भंवतालीं ।
वीरवरास्तव विजयश्री ये नाचत निज तालीं ॥
हाय ! शिरीं परि याच काळिं कां घुसला अरितीर ।
सहर्ष गेला समररंगणीं बिचवा शाहीर ॥

( ४ )

वीरशिरावर जों झणझणला दुर्दैवें तीर ।
समशेरीचा हात हरपला प्रतिभेचा पूर ॥
चैतन्याचा चूर असा या होतां अवकाळीं ।
पळापूर्विच्या पराक्रमाला रडणें ये भालीं ॥
वीराभंवतीं झाले गोळा दैवाचे दास ।
वदे वीर त्यां करुण वाणिनें " आतां कां आस ! ॥

मी पडतां जर तुम्ही भीतिनें मज भंवतीं जमला
स्वातंत्र्याची बात कशाला ज्यावरि मम डोळा ॥
स्वातंत्र्याचीं गाणीं गावुन वाटे भीत मना ।
प्रणयाचा परदास्यामधिं मग होइल धिंगाणा ॥
नको कल्पना, माझा हा डफ नसेचि त्यासाठीं " ।
हाय ! फुटे डफ 'वीरवराची तार तुटे पाठीं ॥
महाराष्ट्रिंची मंगलता मग ढाळि अश्रुपूर ।
कसा निमाला समररंगणीं बिचवा शाहीर ॥

—पुष्कर

## वाघ्याचें गाणें

[ जानपद गीत ]

तुणतुण्याची तार माझी आहे तुटलेली
जोडणार तिला कैसा कोण कोण्या काळीं ?
माझ्या घरीं धनीण माझी आहे रुसलेली
आतां तिला कोण्या यत्नें करूं हो हंसेली ?
लहानगी पोर माझी आहे हो भुकेली
चार घांस चारा तिला, पोर गोड भारी !
आतां किनी बाबा ! माझीं गाणीं पुरे झालीं
सुखी ठेवो देव, लावा भण्डारा हा भाळीं !
एक पैसा देई बाबा ! वाघ्याला या वेळीं
उदण्डायु देवो तुम्हां बळी हा मल्हारी !

—अनन्त हरि जोशी

## विश्व

[ चाल–भूपतिवैभव ]

कितितरी अहा ! हीं रत्नें वर आकाशीं !
हीं माणिक-मोतीं खालीं सिन्धुतळाशीं !
अन् मधेंच आम्ही रत्नें पण रत्नें रे—
— रे ! माप असें हें कुणास फसवायासी ?

—पण्डित सम्रे

## उषेचा विवाह

[ चाल–येउं दे करुणा ]

विवाहऽ ठरला, ठरला उऽषेचा
लाडक्या ईश्वरकन्येचा
नवरा नेमस्त, नेमस्त केला
प्रतापी श्रीरविरायाला
ठरविली वेळा, वेळा शुभदिवशीं
प्रभातीं सप्तम घटिकेसी
थाट तो कैसा, कैसा वर्णावा
नभींच्या भाटांनीं गावा !
वऱ्हाडी जमती, जमति मिरविणारे
अंबरीं सतत हासणारे
वऱ्हाडी आले, आले पहाटेला
लागले घाई करण्याला
वऱ्हाडी आले, आले मांडवांत
सजविल्या नील सुरंगांत
बोहलें रचिलें, उंच पर्वताचें
सुंदर हिरव्या रंगाचें
बोहलें रचिलें, रचिलें पूर्वेला

मंडपीं दूर क्षितिजाला
गुलाल पसरीला, पसरीला दाट
मळविली नवऱ्याची वाट !
नवरदेव आले, आले डौलांत
शोभती सुवर्णमुकुटांत !
नवरदेव आले, आले महिवरती
बोहल्यावरीं तदा चढती
देवि उषा आली, आली हंसगती
द्विजगण वाद्यें वाजवितीं !
नेसली देवी, देवि चारुगात्री
भरजरी पीत अष्टपुत्री !
विवाहऽ झाला, झाला आनंद
सकलही झाले मग दंग !
देवि उषा गेली, गेली मोदांत
जाहली विलीन तेजांत !

—पु. वि. करंदीकर

## नापास झाल्यावर

[ जाति—भूपतिवैभव ]

राहसी एकला तूंच अखेरी खालीं
का खन्त मना रे ! यास्तव वाटुनि घेसी ?
— रे ! न्यायच हा बघ शंख नि शिम्पा वरती
अन् माणिकमोतीं सिन्धुतळाशीं खालीं !

—पण्डित सप्रे

## जिङ्कूं यशःश्री पुन्हां
[ सुनीत ]

अन्धारामधुनी कुठें चमकुनी एकाकिनी चान्दणी
आशा अन्तरिं पालवून तिमिरीं जावी पुन्हां लोपुनी
तेजें त्यापरि तेवुनी, उजळुनी दिक्प्रान्त सौदामिनी
जावी दाट तमीं झणीं मिसळुनी तद्रूपता पावुनी
किंवा निर्झर एकला खळखळा वाहूनिया वैभवीं
ओसाडींत विरे–परी भंवतिंची नापीक राही मही !
—काळोखा निवटावया चहुंकडे ज्योत्स्ना हवी निर्भर !
कीं गङ्गाजल पाहिजे नटविण्या भूलोक लोकोत्तर !
तेवीं राष्ट्रिय-भावना तळपते साण्डून तेजःकण
दास्यीं आज कुठें–परन्तु विझते ती व्यर्थ लाभाविण
आहे राष्ट्रिय-भावनेंत भरली स्वातन्त्र्य-संवेदना
लाभे सद्यश तीमुळेंच म्हणुनी राष्ट्रोन्नती-साधना !
आतां भेद म्हणून जाळुनि मनीं ती बिम्बवूं भावना
भाग्यातें चढवून राष्ट्र अपुलें जिङ्कूं यशःश्री पुन्हां !!

—दत्तात्रय

## निसर्ग आणि मानव
[ जाति–रसना ]

तोडून मानवानें घनदाट रान सारें,
असुरीबळें उभारी तो तेथ राजवाडे
कालान्तरें परन्तू विच्छिन्न पावती ते
येई पुन्हां दिसोनी घनदाट रान तेथें !

—पु. वि. करंदीकर

[ Edward F. Garesche च्या The Cycle वरून. ]

## एकाकिनी तारका

[ चाल—बहु असोत सुन्दर ]

तारे ! कां बैसलीस सांग एकटी ?
शंका तव गोन्धळती काय हृत्पटीं ?
भुर्भुरत्या या बटांशीं वायु खेळतो
मुक्त केशभार स्वैर काय लोळतो ?
वद्य कांहीं खान्द्याहुनि सरकल्या पटीं !
सोडुनि कां तुजलागीं जात मैत्रिणी ?
वेंचिण्यासि प्राजक्तां दूर नन्दनीं ?
होशी कां म्हणुनि सखे ! सांग हिम्पुटी ?
गोड स्मृति नाथाची काय होतसे ?
पत्र रम्य रुसव्याचें रचिसि राजसे !
म्हणुनी या मन्देच्या बैससी तटीं !
रोहिणिच्या संगें कां कान्त रंगला ?
म्हणुनी या बालेचा प्रणय भंगला ?
हृन्मन्दिरिं उभवीसी भेट चोरटी ?
करुनी शृंगारसाज तूंच नववधू
भेटणार रात्रीं या तुजसि गे विधु !
देइल तो अनुरागें भेट शेवटीं !

—अनन्त हरि जोशी

ग्रंथ संग्रहालय
५१७८३
शाखा (स्थळ

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

## तुझा महिमा

[ वृत्त–वसन्त ]

[ देवास उद्देशून ]

तुझ्यासाठीं विवेकाचें किती मीं मोजिलें मोल
तुझा प्रासाद शोधाया प्रमाणें व्हायचीं फोल !
तुला आत्मीयतेनें मीं दिला हा मानवी देह
'जिथें आलाप नामाचा तरङ्गे' तें तुझें गेह

मनश्चक्षूंपुढें यावी तुझी ती सांवळी मूर्ति
म्हणूनी ध्यानयोगाची मला ही जाहली स्फूर्ति
तुझी जी गूढ चिच्छक्ति तिन्ही लोकांस आधार
तिला का देहरूपाची प्रतिष्ठा वाटते फार ?

चढूं दे भक्तिभावाच्या जलाला रोमरोमांत
धरेला झेलुनी हातीं करूं स्वर्गावरी मात !
जला पाजून गङ्गेचे मृताला जीववूं येथें
तुझ्या नामामृताला का सुधेनें माधुरी येते ?

मनींच्या स्नेहदीपाचें पदीं या पाजळूं ओज
टिपें नेत्रांतलीं येसी पुसाया तूंच ना रोज ?
वदूं दे निन्दकांना कीं, "कुठें आहे तुझा देव ?"
परी आत्मीयतेनें तूं सख्या घेसी सदा धांव !

—रामचन्द्र माधव कुलकर्णी

## हुरहूर

[ अभङ्ग

पाण्याच्या तळाशीं दगड पोंचावा
लहरी उठाव्या पाण्यावरी १
वात्सल्यप्रेमानें हृदय थरारे
म्हणूनी हम्बरे गाय वनीं २
वीज चमकावी मेघांत लपावी
मग आलापावी आकाशीं ना ! ३
देवा ! हृदयांत तुझी हुरहूर
म्हणूनी मी वर नांव घेतों ! ४

—पु. वि. करंदीकर

## जग

[ जाति—भूपतिवैभव ]

बाजूस पहा तें ग्रन्थालय कीं जेथें
मिळतें न हवें तें पुस्तक, त्यापरि सारें—
हें असें पहा जग : जेथें एकहि कांहीं
जीवास हवें तें मिळें न हाय ! कधींही !

*　　　　*　　　　*

‘ हें काय बरें !’—तों पुसतां सांगितलें कीं
‘ ही मशीद रे ! जन देति जिला “जग” संज्ञा
वर निळा निळा किति घुमट भव्य दिसताहे
चुकलेले खालीं फकीर आपण सारे !’

—पण्डित सप्रे

## शास्त्रज्ञांचें गाणें

[ वृत्त–पाण्डवदिडकी ]

दिग्गजांचा घेउनी आधार आम्ही वावरूं
स्वैर कोठेंही फिरूं
वा विमानांतून धुण्डूं अम्बरींच्या तारका
भास्कराच्या बालिका
चंचला मेघांतुनी वा आणुनीया खालती
या दिवाळ्या साजती !
जुम्पुनी वा तीं रथांना थाटवूं हीं वाहनें
मानवांचीं भूषणें
मेघरायाची नको आतां प्रतिष्ठा वाढती
रोषतां नाहीं क्षिती !
मिश्रवूं रासायनें सृष्टीसतीला धुण्डुनी
वर्षवूं धारा वनीं
पंचभूतांच्या प्रयोगान्तीं करूं वा विकृति
एवढाल्या आकृति
स्वधरा कीं नाचवूं बोटावरूनी आपुल्या
या कळीच्या बाहुल्या
या चमत्कारा बघाया तत्त्ववेत्त्यांनों ! चला
वाद सारा सम्पला
ब्रह्म-जिज्ञासा कशाची फोल तुम्हां लागली !
—ज्ञात-अज्ञातांतली ?

सारितां माया म्हणूनी दूर बाजूला धरा
धुन्द आणी ती सुरा
याच मायेंतून आम्ही निर्मितों ब्रह्माण्डही
ब्रह्मदेवाची मही
या बघा झेण्डे यशाचे रोंविले स्वर्गांतरीं
इन्द्रइन्द्राणीपरी
जीवनिर्मातेहि साऱ्या विश्वव्यापाचे धनी-—
कोण शास्त्रज्ञांहुनी ?

**—रामचन्द्र माधव कुलकर्णी**

## तूं

[ जाति–भूपतिवैभव ]

तुजविषयीं करितां विचार
कळलें मजसी !
नाहींच तुला रे !
आदि आणखी अन्त !
म्हणजेच एक तूं
पुस्तक जीर्ण विशाल
नाहींत जयां
पहिलीं नि कडेचीं पानें !

**—पण्डित सप्रे**

## मनधरणी

[ जाति–प्रणयप्रभा ]

किति गडे, करावी मनधरणी
तरि अढी अजुन आहेच मनीं !

जीव लोभला तुझियावरती
तूंच तयासी जीवित-सृष्टी !
मूर्तिमन्त जगिं केवळ प्रीति
निशिदिनीं ओढितों तव स्मरणी !

हृदयीं आसन तुझें माण्डुनी
भाव-सुमांनीं पूजा बान्धुनि
रात्रन्दिन मी दङ्ग चिन्तनीं
लागला छन्द तव मनरमणी

दिव्य तेज तव भरलें नयनीं
स्फूर्तिसुधारस निथळे त्यांतुनि
फुलवि सुखाची बाग जीवनीं !
तुजमुळें मला ही प्रिय धरणी !

हनुमन्तापरि हृदय उघडुनी
काय दाखवूं साङ्ग मोहिनी ?
तूंच राहसी तेथें भरुनी
नच स्नेहभाव हा वरकरणी

आजवरीची पुरे वञ्चना
दिव्य प्रीतिचा खोल खजीना

दे सञ्जीवन सुखस्वप्नांना
किति करूं अहर्निश आळवणी !
दाविशील ही अशि चाळवणी
साङ्ग कोठवर जादुगारिणी !
सम्पवि आतां तरि खेळवणी
जळतसे जीव हा दिनरजनी !

—दत्तात्रय

## तेव्हां आणि आतां

[ अञ्जली-सुनीत ]

तेव्हां निर्मल वासना विचरल्या होत्या मनोमन्दिरीं
तत्त्वांचा उदधी मनांत कितिदां हेलावला सारखा
प्रेमाचें अमरत्व कीं न कधिंही मीं यौवनीं शङ्किलें
उन्मादांत प्रभूसमान गणिलें या देशभक्तां तसें !

आतां कोसळले तयांतिल किती भोळे मनोरे परी
वाटे गूढ जगांत ना नियमिता; चाले जुगारी जशी !
प्रीतीचे लटकेच वा पसरिले सारे लपण्डाव हे—
कोणींही न जगीं कधीं सजविली का मानवी पूर्तता !

तेव्हांची न मुळीं जगांत उरली ही आज आत्मीयता—
अज्ञानांतिल भाबडी रुचिरता ज्ञानामुळें सम्पली !

—रामचन्द्र माधव कुलकर्णी

## दीपावलि

[ जाति–चन्द्रकान्त ]

दीपावलि पातली दिव्यांची माल झळाळीत
आणि मानसीं असे कल्पनातरङ्ग उठवीत :
—परदास्याचा दाहि दिशीं जो दाटे अन्धार
त्या दिपवाया चैतन्याचा उसळे अङ्गार
नसानसांतुनि रसरसलेला पेटे अभिमान
जातिवन्त निज राष्ट्रतेज कीं ये हेलावून
सत्तेच्या नजरेस दाविण्या तेज भारताचें
अन्धाराच्या सिन्धूमधला वडवानल नाचे
रण-सिंहाच्या हृदयामधल्या जळत्या आकाङ्क्षा
उफाळल्या कीं जागवावया सुप्त हिन्द-देशा
देशभक्तिनें सळसळणारे रक्तांचे थेम्ब
फवारुनी सुचवीत काय हा स्वातन्त्र्यारम्भ
मागुति येत्या सौख्य-सुधेच्या कीं पर्जन्याची
ग्वाही देई तेजोमयता असङ्ख्य जीवांची
किंवा देवी माङ्गल्य-श्री ज्यांतुनि चमकेल
सुरङ्गरङ्गित ते हेमाम्बुज-पराग उत्फुल्ल
स्वातन्त्र्य-स्वागतार्थ सजुनी ही भारतमाय
पञ्चारति घेउनी निजकरीं आली कीं काय ?

——पुष्कर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

## अवधीरणेनन्तर

[ चाल—कठिण कठिण कठिण किती]

[ दुष्यन्तानें शकुन्तलेचा त्याग केल्यावर गौतमी राजास रागावून बोलते आहे अशी या कवितेची भूमिका आहे ]

वंचिलीस पाहुनिया पोर भाबडी ही
विश्वासुनि तुजवरती घेतली उडी ही
आश्रमांत कामाचा बेत साधुनी
कण्वाची सुन्दरशी पोर मोहुनी
राज्ञीपद देण्याचें मिषहि दावुनी
प्रीतीचा खेळ न कधिं खेळली कुडी ही !
सुन्दर निर्व्याजमधुर बघुनि बालिका
रिझवी तुज अन्तरांत वदनचन्द्रिका
सूड असा प्रीतीचा घेतलास व
म्हणुनी का नगराची होय तांतडी ही
प्रीतीची भाषा ही लाजरी अ
भरुनी उन्माद मधुर लाविते पिसे
संगोत्सुक आम्हांसी पोर ना पुसे
साधिलासि का दावा ?–हाय बापुडी ही !
हुंगुनिया पुष्प तुवां फेंकुनी दिलें
शोभत तुज सम्राटा ! फार चांगलें !
प्रमदेचें जीवन त्यामधिंच पोळलें
जगताच्या वाऱ्यावरि जात बावडी ही !

—अनन्त हरि जोशी

REFBK-0005143
REFBK-00051